12	**Kalimullah / Sajada Khatoon** 296 1 8 Flr Grd Dharavi Dhorwada Khambdevi Road Mp Nager Dhorwada Dharavi Mumbai - 400017 Also At Kalimullha , Mahabatpur Dhaka, Dhaka, East Champaran, Dhaka, Bihar - 845418 Also At Flat No 101 1st Floor A Wing Hill Side Residency Mamdapur Neral Karjat - 410101 Also At M.a Carry Bags , D-65-1-1 Ground Floor Maharana Pratap Nagar Khamdevi Road Dhorwada , Dharavi Mumbai - 400017	Flat No 101 1st Floor A Wing Hill Side Residency Mamdapur Neral Karjat - 410101. Admeasuinrg: _31,67_sq. Meters Carpet Area Land Bearing Survey No. 175 & Plot No. 19 Near Space Gold Crest, Internal Road Situated At Village Mamdapur, Tal Karjat, Dist Raigad.Towards East : Building Towrads West: Road Towards North: Road Towards South: Open Plot Admeasuinrg: _31,67_sq. Meters Carpet Area	**Rs. 925000/- (Rupees Nine Lakh Twenty Five Thousand Only)** / **Rs. 92500/- (Rupees Ninety Two Thousand Five Hundred Only)**	**29-Aug-26 Time 11am to 12 Pm** / **Last Date & Time for Bid Submission: 28-Aug-26**	**Rs. 2538248/- As On Date 01-Jul-26**	**Authorised Officer Name Hareesh Gowda/ Sandeep Nair Mob No-9594597555 / 917715078411 Email ID-hareesh. gowda@axis.bank.in/ Sandeep3.Nair@axis. bank.in**
13	**Rashida Khatoon Ansari / Mr Mohammad Sanaulla Ansari** Tulip 001 Dream Park Tulip Mamdapur Neral East Raigad Raigad - 410101 - Ph:9967610250 Also At Rashid Ledies Tailor 001 Tulip Dream Park College Road Mamdapur Neral East Mamdapur 410101 Raigad Also At Shehnai Hacc Kamla Raman Nagar Baigan Wadi Dumping Ground Govandi Shenai Hacc 400043 Mumbai Also At Flat No 203 2nd Floor Type A4 Orchid Dreams Park Mamdapur Village Road Neral East Raigad 410101	Flat No 203 2nd Floor Type A4 Orchid Dreams Park Mamdapur Survey No. 87, H. No. 2, S. No. 180 ,Plot No. 4, Village Road Neral East Karjat Raigad 410101. Admeasuinrg: 31.29 Sq. Mtrs Carpet Area Towards East: Open Plot Towards West: Road Towards North : Open Plot Towards South: Building	**Rs. 1000000/- (Rupees Ten Lakh Only)** / **Rs. 100000/- (Rupees One Lakh Only)**	**29-Aug-26 Time 11am to 12 Pm** / **Last Date & Time for Bid Submission: 28-Aug-26**	**Rs. 2412757/- As On Date 01-Jul-26**	**Authorised Officer Name Hareesh Gowda/ Sandeep Nair Mob No-9594597555 / 917715078411 Email ID-hareesh. gowda@axis.bank.in/ Sandeep3.Nair@axis. bank.in**
14	**Debasree Saumit Mullick / Mohansingh Balram Thakulla** Flat No 403 Shanti Garden Building No 02 Sector 3 Mira Road East Mira Bhayander Thane - 401107 Also At Debasree Music Classes, 101, 1st Floor To Ddler School Kanakia Road Mira Road East - 401107 Also At G-4, Sonal Kunja Bulding B P Road Cross Road No.5 Bhayander Thane East - 401105 Also At Flat No 302 3rd Floor Wing B Type A1 Building No 12 Sathya Lifestyles Shelavali Gaon Palghar East - 401404	Flat No 302 3rd Floor Wing B Type A1 Building No 12 Sathya Lifestyles Survey No 3 Hissa No 1,/2/4 Shelavali Gaon Palghar East - 401404 Admeasuring Area:- 32-49 Sq Mtrs	**Rs. 1174824/- (Rupees Eleven Lakh Seventy Four Thousand Eight Hundred Twenty Four Only)** / **Rs. 117482.4/- (Rupees One Lakh Seventeen Thousand Four Hundred Eighty Two and Paise Forty Only)**	**29-Aug-26 Time 11am to 12 Pm** / **Last Date & Time for Bid Submission: 28-Aug-26**	**Rs. 2752728/- As On Date 10-May-26**	**Authorised Officer Name TEJAS MAYEKAR/ HAREESH GOWDA Mob.No-917208028580 /919594597555 E-mail ID- Tejas. Mayekar@axis.bank.in/ Hareesh.Gowda@axis. bank.in**
15	**Shailesh Sharma / Pradeep Kumar Sharma** House No Bo 01/5404 Sr No.9 Bilal Pada Gharatwadi Jay Ambe Nagar Nallasopara East Vasai Palghar Pin-401209 Also At Fabric House Shop No-03 Ground Floor Bldg 329/1331 Opp Swadeshi Market Kalbadevi Main Road Mumbai-400002 Also At Flat No 301 3rd Floor B Wing Building No 03 Sai Sidhi Apartment Vill-Mann Near D Mart Boisar East 401501 Also At Sr No 97 Kaif Malik Compound Dhaniv Baug Near Shiv Mandir Nallasopara East Vasai Palghar Pin 401209	"All The Piece And Parcel Of Immovable Proiperty Being Flat No 301 3rd Floor B/Wing Building No-03 Sai Siddhi Apartment Gat No 4,Vill-Mann Near D-Mart Boisar East-401501 " Admeasuinrg: _33.55sq. Mtrs Carpet Area Towards East : Building,Towards West : Road, Towards North : Open Plot, Towards South : Building	**Rs. 900000/- (Rupees Nine Lakh Only)** / **Rs. 90000/- (Rupees Ninety Thousand Only)**	**29-Aug-26 Time 11am to 12 Pm** / **Last Date & Time for Bid Submission: 28-Aug-26**

'डीजे लावणी', अश्लील डान्सवर तातडीने बंदी घाला!

चित्रपट महामंडळाची सरकारकडे मागणी

पुणे : डीजे डान्स आणि डीजे लावणीच्या नावाखाली महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीची विटंबना करणारे अशोभनीय कार्यक्रम तातडीने बंद करण्यात यावेत, अशी मागणी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले आणि अभिनेत्री व सामाजिक कार्यकर्त्या टीना शर्मा-घेवारे मंगळवारी यांनी पत्रकार परिषदेत केली.

चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेत्री टीना शर्मा घेवारे यांच्यासह सर्वात्मक महारुद्र ट्रस्ट व राष्ट्रीय महाकाल सेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रकाश भाऊ शिंदे, मनसे पुणे शहर सचिव सोनाली पोकळे, दिशा फाऊंडेशनच्या अर्चना चंदनशिवे तसेच मराठी रंगभूमी निर्माता महासंघ व बालगंधर्व परिवार ट्रस्टचे अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. लावणीच्या नावाखाली सध्या सुरू असलेला अश्लिलतेचा बाजार थांबवण्यासाठी शासनाने थेट आदेश द्यावेत आणि 'कला हवी, अश्लीलता नको' ही भूमिका कठोरपणे राबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

अल्पवयीन मुलांचाही सहभाग

सध्या डीजे लावणी आणि डान्सच्या नावाखाली आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमध्ये अत्यंत अशोभनीय अंगविक्षेप करणे, पैशांची उधळण करणे आणि प्रेक्षकांना थेट स्टेजवर बोलावून सादरीकरण करणे अशा गोष्टी घडत आहेत. यामुळे महिला कलाकारांना अत्यंत लज्जास्पद वाटेल अशा पद्धतीचे वातावरण तिथे निर्माण होत आहे. या सगळ्यात अत्यंत चिंतेची बाब म्हणजे, अशा अश्लील कार्यक्रमांमध्ये अल्पवयीन मुलांनादेखील सहभागी करून घेतले जात आहे, जो एक अत्यंत गंभीर सामाजिक प्रश्न बनला आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे केवळ साधे मनोरंजन म्हणून न पाहता, महिला व बालसुरक्षा तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून याकडे गांभीर्याने पाहावे व अशा कार्यक्रमांवर बंदी घालावी, अशी मागणी भोसले यांनी केली आहे.

अशोभनीय सादरीकरण

लावणी ही महाराष्ट्राची समृद्ध आणि अत्यंत अभिमानास्पद अशी लोककला आहे. मात्र, लावणीच्या गोंडस नावाखाली अश्लील नृत्य आणि अशोभनीय सादरीकरण करून या कलेची बदनामी करणाऱ्यांना समाज व कला क्षेत्रात थारा दिला जाऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. जे गुणवंत लावणी कलाकार आहेत, त्यांना योग्य व्यासपीठ, आदर व रोजगाराच्या नवीन संधी शासनाकडून मिळाल्या पाहिजेत, असेही त्या म्हणाल्या.

अश्लिलतेला कोणतेही स्थान मिळता कामा नये

कलेचा सन्मान राखणे ही कलाकारांची स्वत:ची जबाबदारी आहे. लावणी हा केवळ डान्स नसून त्यामध्ये अभिनय, नृत्य, विविध भावभावना आणि महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा एक अत्यंत सुंदर संगम असतो. अशा समृद्ध कलेला अश्लील हावभावांमुळे बदनाम करणे हे अत्यंत चुकीचे आहे. मूळ आणि गुणवंत कलाकारांना त्यांचा सन्मान मिळाला पाहिजे आणि या पवित्र क्षेत्रात अश्लिलतेला कोणत्याही प्रकारचे स्थान मिळता कामा नये, असे टीना शर्मा यांनी नमूद केले.

४४ सदस्यांचे पद रद्द

निवडणूक खर्च न दिल्याने १२ नगरपालिका, १ नगरपंचायतीत कारवाई

नांदेड : निवडणूक खर्चाचा हिशोब वेळेत सादर न केल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील विविध १२ नगरपालिका आणि एका नगरपंचायतीमधील ४४ उमेदवारांना पुढील तीन वर्षांसाठी सदस्य पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे. सन २०२५ मध्ये पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर उमेदवारांना त्यांच्या निवडणूक खर्चाचा तपशील ठरावीक मुदतीत सक्षम अधिकाऱ्यांकडे सादर करणे कायद्याने बंधनकारक होते.

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की, आमचे अशील **मेसर्स मुथूट मनी लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालयः 41/4108, A-18, बेसमेंट फ्लोअर, सरिता थिएटरसमोर, बॅनर्जी रोड, एर्नाकुलम, केरळ-682018, CIN: U65910KL1994PLC008454, फोनः 0484-2394712, reports@muthootmoney.in** यांच्याकडून थकबाकीदार कर्जदारांनी आमच्या अशिलाकडे तारण ठेवलेल्या दागिन्यांचा लिलाव करण्यात येत आहे. हा लिलाव **(30.11.2025** पर्यंतच्या कालावधीतील **कमी शुद्धता / कमी दर्जा / अपूरे वजन)** यांमुळे कपात करण्यात आलेल्या खात्यांशी संबंधित आहे. त्याचा तपशील खाली दिला आहे. सर्व इच्छुक व्यक्ती या लिलावात सहभागी होऊ शकतात.

GSTIN-27AABCM5816A1ZV
पहिल्या लिलावाची तारीख व वेळः 15.09.2026, 11:00 A.M.
दुसया लिलावाची तारीख व वेळः 16.09.2026, 11:00 A.M.
तिसया लिलावाची तारीख व वेळः 17.09.2026, 11:00 A.M.
जिजामाता चौक-बीड (0189): MDL-533
लिलाव केंद्रः मुथूट मनी लिमिटेड, अप्पर ग्राउंड फ्लोअर, जमुना कॉम्प्लेक्स, जिजामाता चौक, डीपी रोड, जिल्हा-बीड, महाराष्ट्र-431122

संबंधित शाखेच्या शीर्षकाखाली नमूद केलेल्या कर्ज खात्यांचे लिलाव वरील तपशीलानुसार संबंधित लिलाव केंद्रांवर आयोजित केले जातील. नियोजित पहिल्या लिलावाच्या तारखेला लिलाव यशस्वी झाले नाहीत किंवा पूर्ण झाले नाहीत, तर वर दिलेल्या तपशीलानुसार **संबंधित लिलाव केंद्रांवर दुसया आणि तिसया लिलावाच्या तारखांना** लिलाव आयोजित केले जातील किंवा सुरू ठेवले जातील. यासंदर्भात यापुढे कोणतीही स्वतंत्र सूचना जारी केली जाणार नाही.

कोहली अँड सोबती अधिवक्ते D-72, लोअर ग्राउंड फ्लोअर, पंचशील एन्क्लेव्ह, नवी दिल्ली-110017

टीपः ग्राहक आमच्या अशिलाची सर्व थकबाकी भरून नियोजित लिलावाच्या तारखेपूर्वी तारण ठेवलेले दागिने सोडवून घेऊ शकतात. ग्राहक **reports@muthootmoney.in** या ईमेल आयडीवरही संपर्क साधू शकतात.

जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की अधोहस्ताक्षरी विनय चकाला को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतुदींनुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून, तिचा नोंदणी क्र. बीओएम/एचएसजी/५५६७ वर्ष १९७८ आहे व तिचे कार्यालय :- सीटीएस १४९, प्लॉट क्र. ९५/५, तरुण भारत कंपाऊंड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९९ येथे आहे, हिच्या खाली नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करीत आहेत. सदर मिळकतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाण, भाडेपट्टा, भाडे, धारणाधिकार, भार, देखभाल, परवाना, भेट, वारसा, हिस्सा, कब्जा, सुखाधिकार, न्यास, मृत्युपत्रीय देणगी, कब्जा, अभिहस्तांकन आणि/किंवा कोणत्याही स्वरूपाचा बोजा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी किंवा मालमत्ता हक्क असलेल्या आणि/किंवा असल्याचा दावा करणाऱ्या सर्व व्यक्ती, संस्थांनी अशा कोणत्याही दाव्याची माहिती खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोहस्ताक्षरीस लेखी स्वरूपात, सर्व आवश्यक व पुष्टी करणाऱ्या कागदपत्रांसह, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावी; अन्यथा कोणतेही दावे नाहीत आणि/किंवा सदर दावे, असल्यास, त्याग केलेले आणि/किंवा सोडून दिलेले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

मिळकतीचे परिशिष्ट
(मिळकतीचे वर्णन)

चकाला गाव, तालुका अंधेरी (पूर्व) येथील सीटीएस क्र. १४९, सर्व्हे क्र. ९५, हिस्सा क्र. ५ असलेल्या जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, ज्यांचे क्षेत्रफळ सुमारे २३५८ चौ. यार्ड म्हणजेच १९७१.५ चौ. मीटर आहे, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर नोंदणी जिल्ह्यात स्थित असून, त्यावर सन १९८० मध्ये बांधलेल्या दोन विंगच्या दोन इमारती आणि अन्य संरचना आहेत, ज्यांच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत: पूर्वेस कोंदिविटा गावाची हद्द, उत्तरेस हिस्सा क्र. १ व २ सर्व्हे क्र. ९५, दक्षिणेस हिस्सा क्र. ८ व ९ सर्व्हे क्र. ९५, सी.टी.एस. क्र. १५२, आणि पश्चिमेस सीटीएस क्र. १४८ हिस्सा क्र. ४ सर्व्हे क्र. ९५.

दिनांक १३ ऑगस्ट २०२६

सही/-
मुस्तफा मोतीवाला
वरिष्ठ भागीदार
लिंक लीगल
३०२-३०४, रीजेंट चेंबर्स,
जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉइंट
मुंबई-४०००२१
Mustafa.motiwala@dentonslinklegal.com

जाहिर सूचना

आम्ही **(अ) झँडोर होल्डिंग्स एलएलपी.**, ही मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ च्या तरतुदींनुसार समाविष्ट झालेली मर्यादित दायित्व भागीदारी असून, तिचा एलएलपी ओळख क्र. एएटी-२२७० आहे आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय **४, विद्या सीएचएस लि., प्लॉट ६२४, २७, कस्तूर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ (''विकासक'')** येथे आहे, हिच्या खाली नमूद केलेल्या परिशिष्टामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीचा (**''सदर मिळकत''**) पुनर्विकास करण्याच्या हक्काची चौकशी करीत आहोत. सदर मिळकतीवर नवीन बहुमजली इमारत बांधून पुनर्विकास करण्याचा हा हक्क, **विद्या स्टेट सेक्टर बँक एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (''सोसायटी'')** यांनी विकासकाच्या नावे निष्पादित केलेल्या दिनांक १ मार्च, २०२३ च्या विकास करारानुसार **(''विकास करार'')** आहे; आणि (ब) विकास कराराअंतर्गत असलेल्या विकास हक्कांच्या तसेच विकासकाच्या विक्री घटक क्षेत्राच्या (सोसायटीच्या विद्यमान सभासदांना वाटप करण्यात येणाऱ्या बांधकाम केलेल्या जागांव्यतिरिक्त इतर सर्व जागा) संदर्भात (**''विकासकाचे हक्क''**) सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारतीमध्ये, त्यामध्ये अन्य बाबींसह त्यासंदर्भात गहाण निर्माण करून, तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्याच्या विकासकाच्या हक्काची चौकशी करीत आहोत.

सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, गहाण, विकास हक्क प्रदान करणे, भार, भेट, न्यास, देखभाल, कब्जा, भाडेकरार, भाडेपट्टा, लीव्ह अँड लायसन्स, धारणाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा दावा असलेल्या किंवा सदर मिळकतीच्या विकासकाकडून करण्यात येणाऱ्या पुनर्विकासास हरकत असलेल्या आणि/किंवा सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारतीतील विकासकाच्या हक्कांच्या संदर्भात, त्यामध्ये अन्य बाबींसह त्यासंदर्भात गहाण निर्माण करून, विकासकाने तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्यास हरकत असलेल्या सर्व व्यक्तींनी, अशा दावा किंवा हरकतीच्या समर्थनार्थ कागदपत्रांसह, ही जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत, **लॉ स्क्राइब्स, ७०३, डीएलएच प्लाझा, बीटा सोसायटी, एस. व्ही. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५८** येथे अधोहस्ताक्षरीस लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे; अन्यथा असा कोणताही दावा किंवा हरकत अस्तित्वात नाही, असे मान्य करण्यात आले आहे असे समजण्यात येईल आणि असा दावा किंवा हरकत अस्तित्वात नसलेला/त्याग केलेला/सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट
सदर मिळकतीचे वर्णन

बोरिवलीच्या नगर नियोजन योजना क्र. III मधील पूर्वीच्या अंतिम प्लॉट क्र. ६२४ चा भाग असलेला उप-प्लॉट क्र. २७ आणि आता अंतिम प्लॉट क्र. ६२०सी धारण करणारा, सुमारे ६१२ चौ. मीटर क्षेत्रफळाचा सर्व तो भाग व विभाग, कस्तूर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२ येथे स्थित आहे, सदर जमीन.

दिनांक, १३ ऑगस्ट, २०२६.

लॉ स्क्राइब्स यांच्यासाठी
सही/-
नील मांडेविया
ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर

जाहिर सूचना

आम्ही **(a) झँडोर होल्डिंग्स एलएलपी**, मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ च्या तरतुदींअंतर्गत समाविष्ट मर्यादित दायित्व भागीदारी, जिचा एलएलपी ओळख क्र. एएटी-२२७० आहे आणि जिचे नोंदणीकृत कार्यालयः- **४, विद्या सीएचएस लि., प्लॉट ६२४, २७, कस्तुर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२** येथे आहे (**''विकासक''**), हिच्या, यापुढील **परिशिष्टात** अधिक विशेषतः वर्णन केलेल्या अचल मिळकतीचा (**''सदर मिळकत''**) पुनर्विकास करण्याच्या हक्काची तपासणी करीत आहोत, ज्यामध्ये सदर मिळकतीवर नवीन बहुमजली इमारत बांधणे समाविष्ट आहे, हे **मोहन टेरेस ''ए'' को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** (**''सोसायटी''**) यांनी विकासकाच्या नावे निष्पादित केलेल्या दिनांक २१ डिसेंबर, २०२३ च्या विकास करारानुसार (**''विकास करार''**) आहे; आणि **(b)** विकास कराराअंतर्गत विकास हक्कांच्या संदर्भात तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्याचा विकासकाचा हक्क आणि विकासकाच्या विक्री घटक क्षेत्राच्या (म्हणजे सोसायटीच्या विद्यमान सदस्यांना वाटप करण्यात येणाऱ्या बांधकाम केलेल्या जागांव्यतिरिक्त इतर सर्व जागा) संदर्भातील विकासकाचे हक्क (एकत्रितपणे **''विकासकाचे हक्क''**) यामध्ये सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारतीमध्ये, त्यासंदर्भात गहाण निर्माण करण्याद्वारे इतर बाबींसह, समाविष्ट आहेत.

सदर मिळकतीमध्ये किंवा तिच्यावर किंवा तिच्या संदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तींनी, विक्री, अदलाबदल, गहाण, विकास हक्क प्रदान करणे, भार, भेट, न्यास, देखभाल, कब्जा, भाडेकरार, भाडेपट्टा, लीव्ह अँड लायसन्स, धारणाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे किंवा अन्यथा, सदर मिळकतीचा विकासकाकडून होणाऱ्या पुनर्विकासास कोणताही आक्षेप आणि/किंवा नवीन बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील विकासकाच्या हक्कांच्या संदर्भात विकासकाने तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्यास आक्षेप, ज्यामध्ये त्यासंदर्भात गहाण निर्माण करण्याद्वारे इतर बाबींसह समाविष्ट आहे, असल्यास, अशा कोणत्याही दाव्याची किंवा आक्षेपाची पुष्टी करणाऱ्या कागदपत्रांसह अधोहस्ताक्षरीसः- **लॉ स्क्राइब्स, ७०३, डीएलएच प्लाझा, बीटा सोसायटी, एस. व्ही. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८** येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत** लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे; अन्यथा असा कोणताही दावा किंवा आक्षेप अस्तित्वात नाही; असे समजले आणि स्वीकारले जाईल आणि तो अस्तित्वात नसलेला/त्याग केलेला/सोडून दिलेला मानला जाईल.

परिशिष्ट
सदर मिळकतीचे वर्णन

जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, ज्यांचे क्षेत्रफळ १,०१६ चौरस मीटर किंवा समतुल्य किंवा तत्सम असून, पूर्वीच्या सब-प्लॉट क्र. ३८ आणि ३९ चा भाग असलेला आणि पूर्वीचा अंतिम प्लॉट क्र. ६२४ धारक आणि आता नगर नियोजन योजना क्र. III चा अंतिम प्लॉट क्र. ६२० धारक असून, कस्तुर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ येथे स्थित आहे.

दिनांक, १३ ऑगस्ट, २०२६.

लॉ स्क्राइब्स यांच्यासाठी
सही/-
नील मांडेविया
ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर

मृत व्यक्तींना हयात दाखवून जमीन हडपल्याचा आरोप

बोळींजमध्ये ८४ वर्षीय व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

वसई : मृत व्यक्तींना हयात असल्याचे दाखवून बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन खरेदी केल्याच्या आरोपावरून शहाजान अब्दुल्ला मनिहार (८४) यांच्याविरुद्ध बोळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाच्या वतीने वसई क्रमांक ५ येथील सहदुय्यम निबंधक प्रीतम सुनील मोरे यांनी तक्रार दाखल केली आहे. मौजे पोमण, ता. वसई, जि. पालघर येथील सर्व्हे क्रमांक १८७/३ मधील २.६३ हेक्टर जमीन असद हुसैन काजी यांच्या वडिलोपार्जित व कुटुंबीयांच्या सामाईक मालकीची आहे. संबंधित तीन व्यक्तींचे अनुक्रमे १९७७, १९८५ आणि २००१ मध्ये निधन झालेले असतानाही, १६ सप्टेंबर २०२५ रोजी त्या हयात असल्याचे दाखवून बनावट 'डीड ऑफ कन्व्हेयन्स' तयार करण्यात आल्याचा आरोप आहे.

शक्तिपीठ महामार्ग रद्द करा, अन्यथा लढा अटळ

जयंत पाटील, राजू शेट्टींचा इशारा

सांगली : राज्य सरकारच्या नियोजित 'शक्तिपीठ महामार्गा'ला होणारा विरोध आता अधिक तीव्र झाला आहे. या प्रकल्पाविरोधात महाविकास आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला असून, सांगलीत बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. या महामार्गाला विरोध दर्शवण्यासाठी येत्या २१ ऑगस्टला सांगलीत भव्य मोर्चा काढण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

महामार्गाविरोधात जनतेच्या मनात तीव्र रोष...

पत्रकार परिषदेत जयंत पाटील यांनी मोर्चाची माहिती दिली. ते म्हणाले, 'शक्तिपीठ महामार्गाविरोधात जनतेच्या मनात तीव्र रोष आहे. जनतेच्या याच भावना सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी २१ तारखेला सकाळी ११ वाजता सांगलीत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महामार्ग होऊ नये यासाठी ज्या-ज्या भागांतून हा रस्ता जाणार आहे, तिथे याआधीही अनेक मोर्चे काढण्यात आल्याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली.

राजू शेट्टींचा सवाल

पत्रकार परिषदेत राजू शेट्टी यांनी अतिशय आक्रमक भाषेत राज्य सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, 'आता आम्ही रस्त्यावरची लढाई लढणार आहोत. माझा न्यायव्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही. सरकारने आमच्याशी नाही, तर किमान शेतकऱ्यांसोबत तरी चर्चा करायला हवी होती'. प्रकल्पाच्या खर्चावर गंभीर आरोप करताना शेट्टी म्हणाले, 'जो रस्ता ४५ हजार कोटींमध्ये होणार होता, तो आता १ लाख १० हजार कोटी रुपयांत करायचा घाट घातला जात आहे.

सुविधांचा अभाव अन् टोलचा सुळसुळाट

राज्यातील इतर प्रश्नांकडे लक्ष वेधताना शेट्टींनी सरकारला खडे बोल सुनावले. 'राज्यातील सरकारी दवाखान्यांची वाईट अवस्था जाऊन बघा. सरकारकडून जनतेला साध्या मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. दुसरीकडे, राज्यात हळूहळू टोलनाक्यांची संख्या एवढी वाढली आहे की, आता सरकारने नेमकं करायचं काय?' असा संतप्त सवाल त्यांनी केला.

दिंडोशी, मुंबई येथील नगर दिवाणी न्यायालयात
एस.सी. वाद क्र. २६९० सन २०१९

श्री. सागर लक्ष्मण जाधव
पत्ता : फ्लॅट क्र. ०१ ए, आविष्कार सीएचएस लि., तळमजला, इमारत क्र. ३, एफ विंग, प्रताप नगर, जेव्हीएलआर लगत, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६० ...वादी

विरुद्ध

१. व्यवस्थापक, कॅनरा बँक
पत्ता : वेस्ली चर्च हॉल, कुलाबा पोलीस स्टेशनजवळ, मुंबई ४०००३९.
२. श्रीम. प्रिया राधेश मेनन
पत्ता : ए/२, राज रत्न बिल्डिंग, तळमजला, डॉ. आनंद नर्सिंग होमच्या पुढे, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे लगत, बी.एम.सी. गार्डनजवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०.
३. श्री. राधेश राधाकृष्ण मेनन
पत्ता : ए/२, राज रत्न बिल्डिंग, तळमजला, डॉ. आनंद नर्सिंग होमच्या पुढे, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे लगत, बी.एम.सी. गार्डनजवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०.
४. मे. केशवी डेव्हलपर्स
पत्ता : ए/२, राज रत्न बिल्डिंग, तळमजला, डॉ. आनंद नर्सिंग होमच्या पुढे, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे लगत, बी.एम.सी. गार्डनजवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०. ...प्रतिवादी

नोंद घ्यावी की, सदर वाद हा वादामधील नमुद अनुतोषांकरिता वरील प्रकरणात **२९ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ११:०० वा.** न्यायालय खोली क्र. ४ मधील पिठासीन **सन्मा. न्यायाधीश युनूस मोहमद हनीफ खराडी** यांच्यासमोर प्रचलित होणार आहे.

ज्याअर्थी, वरील नावाच्या वादींनी प्रतिवादींच्या विरोधात वरील वादामध्ये **एस. सी. वाद क्र. २६९० सन २०१९** दाखल केला आहे.

तुम्हाला २९ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ११:०० वा. व्यक्तीशः किंवा रितसर माहिती असलेल्या प्लिडरद्वारे सन्मानी नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी, बोरिवली विभाग, मुंबई, न्यायालय कक्ष क्र. ४ यांचेसमोर हजर राहण्यासाठी याद्वारे सूचीत करण्यात येत आहे, कसूर केल्यास कायद्यानुसार तुमच्या गैरहजेरित वादाची सुनावणी होऊन निर्णय केला जाईल.

माझ्या हस्ते आणि सदर सन्माननीय न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

सही/-
सीलर
सदर दिनांक १४ जुलै, २०२६

सही/-
शिक्का
सदर दिनांक १४ जुलै, २०२६
सही/-

मे. सोलिसिस लेक्स
वादींकरिता वकील
'ए' विंग, ६वा मजला, नॉक्स प्लाझा, माइंडस्पेस, इनोर्बिट मॉलच्या मागे, लिंक रोड लगत, मालाड पश्चिम, मुंबई ४०० ०६४.
ओ.एस. नोंदणी क्र. १२४२६. / वकील कोड : १३६०१ / एमएएच-एलएफ/२९/२०२३
ईमेल: ameet.mehta@solicislex.com / avani@solicislex.com
फोन: ९८२१२८३२३२/९९२०३३४२४५

निबंधकांकरिता
नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी

ADITYA BIRLA CAPITAL
HOME LOANS

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयन कंपाऊंड, वेरावळ, गुजरात -३६२२६६ | (दू) +९१ २२४३५६७१०० | (टोल फ्री) १८०० २७० ७००० | सीआयएन: यु६५९२२जीजे२००९पीएलसी०८३७७९ | homefinance.adityabirlacapital.com
शाखा कार्यालय: आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लि., जी कॉर्पोरेशन टेक पार्क, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे - ४००६०७ (एमएच)

परिशिष्ट IV
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(१) पहा)
कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरीता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन दिनांक **१३.०३.२०२६ रोजी मागणी सूचना जारी करून सदर सूचनेत नमूद कर्जदार शिवराम परमेश्वर बांघेरा आणि अश्विनी शिवराम बांगेरा** यांना **रु. २७,९५,२६७.२९/- (रुपये सत्तावीस लाख पंच्याण्णव हजार दोनशे सदुसष्ट आणि एकोणतीस पैसे मात्र)** इतकी रक्कम सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्याचे आवाहन केले होते.

कर्जदारांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे, म्हणुन कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा हा त्याला/तिला दिलेल्या अधिकारांचा वापर करुन सदर ॲक्टचे कलम १३(४) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन ह्या **१० ऑगस्ट, २०२६** रोजी घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की त्यांनी सदरहू मिळकतीसह देवघेवीचा कोणताही व्यवहार करु नये आणि सदरहू मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**च्या रक्कम **रु.२७,९५,२६७.२९/- (रुपये सत्तावीस लाख पंच्याण्णव हजार दोनशे सदुसष्ट आणि एकोणतीस पैसे मात्र)** आणि त्यावरील व्याज आणि त्यावरील व्याजाच्या अधीन राहील. कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम ८ च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

गाव पाडले, तालुका आणि जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र ४२१२०४ येथे स्थित, बाधंकामित जमिन धारक सर्व्हे क्र. ३०, हिस्सा क्र. २, सर्व्हे क्र. ३०, हिस्सा क्र. ३ आणि सर्व्हे क्र. ३१, हिस्सा क्र. ४ भाग, ''सुनंदा सर्कल'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील, ''सुनंदा सर्कल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमधील, ए विंगमध्ये, ३ऱ्या मजल्यावरील, मोजमापित ३०.४२७ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळ असलेला फ्लॅट क्र. ३०४ चे ते सर्व भाग आणि विभाग.

दिनांक : १०.०८.२०२६ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : बेलापूर **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

बैंक ऑफ़ इंडिया Bank of India BOI
Relationships beyond banking

महालक्ष्मी शाखा,
तळमजला समभाव तीर्थ, २-ए, भुलाभाई देसाई रोड, हाजीअली, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०२६, दूरध्वनी. २३५११६३६, २३५११५९९, २३५२६०१५, २३५२५६३५ / २३५१०५८२. ईमेल Mahalaxmi.MumbaiSouth@bankofindia.co.in

संदर्भ क्र.: एमएचएल/एडीव्ही/एसएआरएफएईएसआय/२६-२७/३०११-३०९ १०.०८.२०२६

कब्जा सूचना

सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी अधिनियम) च्या कलम १३(४) अंतर्गत बँकेकडे प्रभारित तारणाचा कब्जा

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार **बँक ऑफ इंडियाचे** महालक्ष्मी शाखा, तळमजला समभाव तीर्थ, २-ए, भुलाभाई देसाई रोड, हाजी अली, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०२६, प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि कलम १३ (२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२२.०५.२०२६** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **कर्जदार/हमीदार, श्री. शिवम परिहार आणि श्री. सत्यम परिहार (कर्जदार आणि गहाणदार)** यांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. ५,०६,२८,७८१.७१/- (रुपये पाच कोटी सहा लाख अठ्ठावीस हजार सातशे एक्याऐंशी आणि एकाहत्तर पैसे मात्र) अधिक व्याजची** सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या कालावधीत.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, नि